# वैद्य, मेस्त्री, पाटील, पुरंदरे याना 'पॅको पोवार' पुरस्कार जाहीर


रवींद्र मेस्त्री


टी. के. वडणगेकर


डॉ. व्ही. टी. पाटील


रंगा वैद्य


डॉ. साळोखे


शैलजा साळोखे


निर्मलताई पुरंदरे


नलिनी नेने


वसंतराव पेंटर

कोल्हापूर : पॅको पोवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दिल्या जाणाऱ्या 'पॅको पोवार पुरस्कार ९४' या पुरस्कारांची घोषणा शनिवारी पत्रकार परिषदेत करण्यात आली. पुरस्कार विजेत्यांमध्ये ज्येष्ठ [illegible] रंगा वैद्य, ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक डॉ. व्ही. टी. पाटील, ग्रामीण भागात ज्ञानप्रसाराचे काम करणाऱ्या श्रीमती निर्मलाताई पुरंदरे आदींचा समावेश आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष निवास पोवार यांनी सांगितले की, यावर्षीचा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दिनांक २७ एप्रिल ९४ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रायव्हेट हायस्कूलमधील वायू. पी. पोवार स्मृति मंदिरामध्ये होणार आहे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार व विख्यात नाटककार विद्याधर गोखले उपस्थित राहणार आहेत. श्रीमंत छत्रपति शाहू महाराज व महापौर आर. के. पोवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या समारंभाचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु के. भोगिशियन हे भूषविणार आहेत.

पुरस्कार विजेत्यांविषयी सांगताना श्री. पोवार म्हणाले की, डॉ. व्ही. टी. पाटील, रंगा वैद्य व श्रीमती निर्मलाताई पुरंदरे यांच्याखेरीज कसबा बावडा येथील गरीब कुटुंबात जन्म होऊनदेखील आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर सध्या थायलंडमधील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संशोधन करीत असलेल्या व असोसिएट प्रोफेसर म्हणून काम करणाऱ्या डॉ. विलास महादेव साळोखे यांची, कोल्हापुरातील कलामंदिर या चित्रकलेचे शिक्षण देणाऱ्या संस्थेचे शिल्पकार आणि मनस्वी कलाकार टी. के. वडणगेकर यांची, ८० वर्षे वयाचे ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक वसंत पेंटर यांची, क्रीडाक्षेत्रातील अर्जुन पारितोषिक विजेती टेबल टेनिसपटू शैलजा साळोखे हिची, तसेच मुळात मिरज येथे जन्म झाल्यानंतर बी. ई. मेटॅलर्जीची पदवी घेऊन क्युपोला भट्टीची कार्यक्षमता वाढविण्याबाबत अभ्यास करणाऱ्या आणि फौंड्री तंत्रज्ञानावर चार मराठी पुस्तके लिहिणाऱ्या नलिनी विठ्ठल नेने यांची यावर्षीच्या पॅको पोवार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

केसरी २४/४/९४